MHGA030009562023

**<u>मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली यांचे न्यायालय</u>**
**(पीठासीन अधिकारी श्री.एस.पी. सदाफळे)**

**<u>सं.फौ.मा.क्र. ५५०/२०२३</u>**

**<u>निशाणी क्र.१३ पुढे</u>**

महाराष्ट्र शासन,
तर्फे पोलीस स्टेशन, अधिकारी,
पोलीस स्टेशन, गडचिरोली

.... **<u>अभियोग पक्ष</u>**

**-विरुध्द-**

**हरिदास बाबुराव डोईजळ,**
वय ५५ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
राह. अमिर्झा
ता. व जि. गडचिरोली. .... **<u>आरोपी</u>**

..........................................................................................

**<u>कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९.</u>**

---

अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अधिवक्ता : श्रीमती जे.व्ही. बन्सोड
आरोपीतर्फे अधिवक्ता : श्री. के. पी. म्हशाखेत्री

---

**<u>न्यायनिर्णय</u>**

(दिनांक २१/०५/२०२६ रोजी घोषीत)

मु.न्या.दं.
२१.०५.२०२६

सरकार पक्षाने सदर खटला आरोपीविरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत दाखल केला आहे. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरीता माझ्यासमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझी कारणमीमांसा पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक २८.०३.२०२३ रोजी १२.५५ ते १३.४० वाजताचे दरम्यान मौजा अमिर्झा, ता.जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घराचे बाजुला असलेल्या बैलाच्या गोठ्यात तनसीच्या ढिगा-यात १५ लिटर मापाच्या दोन नग पांढ-या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये गावठी हातभट्टी मोहादारू असे प्रत्येकी दोन प्लास्टीक कॅनमध्ये एकुण ३० लिटर हातभट्टी मोहादारू अवैधरित्या विनापरवाना बाळगत असतांना मिळून आला हे सरकार पक्ष सिध्द करते काय? | **...नाही.** |
| २. | सरकार पक्षाने आरोपी विरुध्द इतर गुन्हा सिध्द केला काय ? | **नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **... अंतिम आदेशानुसार** |

## का र ण मी मां सा

२. **मुद्दे क्र.१ ते ३ बाबत :**

साक्षीदार क्र.३ व ४ बयानात सांगतात की, दिनांक २८.०३.२०२३ रोजी ते आरोपीच्या राहत्या घरी गेले असुन घराच्या बाजुला असलेल्या बैलाच्या गोठ्याजवळ तनसीच्या ढिगात प्रत्येकी १५ लिटर क्षमतेचे २ प्लास्टीक कॅनमध्ये हातभट्टी मोहादारू मिळुन आली म्हणुन पंचासमक्ष जप्त करून पुढील कार्यवाही केली. साक्षीदार क्र.५ ने जप्त दारू पैकी वेगळी काढलेली १८० मिली मापाची शिशी रासायनिक परिक्षणाकरीता नेली आणि पावती मुद्देमाल कक्षात जमा केली. पण या अनुषंगाने अपराध क्रमांक २२८/२०२३ मधील जप्त १८० मिली मापाची बॉटल रासायनिक परिक्षणाकरीता तज्ञांकडे प्राप्त झाल्याबाबत पावती अभिलेखावर दाखल नाही. या वरून साक्षीदार क्र.६ ने तपास करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

मु.न्या.दं.
२१.०५.२०२६

३. पंच साक्षीदार पैकी साक्षीदार क्र.१ सरकार पक्षास सहयोग करत नाही, पण साक्षीदार क्र.२ त्याच्या समक्ष आरोपीच्या घराच्या गोठ्याच्या बाजुला असलेल्या

तनसीच्या ठिगात १५ लिटरचे २ कॅन मिळुन आल्याचे व ते जप्त केल्याचे सांगत आहे. पण या अनुषंगाने कथीत घर ज्यामध्ये आरोपी मिळुन आला होता तो त्याच्याच मालकीचा होता किंवा कसे याबाबत कोणताही पुरावा किंवा दस्त अभिलेखावर उपलब्ध नाही. सरकारी साक्षीदार स्वत: सांगतात की, ज्या गोठ्या जवळ हातभट्टी दारू जप्त करण्यात आली ती जागा आरोपीच्या मालकीची असल्याबाबत कागदोपत्र हस्तगत केले नाही. इथे बघणे गरजेचे आहे की, कथीत मुद्देमाल आरोपीच्या घरून जप्त करण्यात आला असुन त्याच्या गोठ्या जवळील तनसीच्या ठिगातुन जप्त केल्यामुळे त्या जागेचे नेमके मालक कोण होते किंवा कसे याबाबत अभिलेखावर सिध्द करून घेणे गरेजेचे होते. पण तपासी अंमलदारातर्फे सदर दस्त हस्तगत करण्यात आले नसुन त्या अनुषंगाने पुरावा उपलब्ध नाही. गोठ्याच्या बाजुच्या तनसीच्या ढिगाची जागा इतर लोकांसाठी सुध्दा उपलब्ध असुन जप्त मुद्देमाल आरोपीच्या मालकीचे होते ही बाब संशयापलीकडे सिध्द होत नाही. म्हणुन जरीही तपासी अंमलदार अंतर्गत केलेली कार्यवाही अभिलेखावर सिध्द केली, पण त्यावरून आरोपीला दोषी ठरविणे न्यायोचित होणार नाही. तसेच त्याने मुद्देमाल जप्त करणा-या सिलच्या कार्यवाहीबाबत सबळ पुरावा अभिलेखावर सिध्द केला नसुन साक्षीदार क्र.५ तर्फे नेलेला नमुना सदर अपराधातीलच होता ही बाब सिध्द करण्यास दस्तऐवजी पुरावा अभिलेखावर उलपब्ध नाही. तसेच सिलची कार्यवाही कोणत्या रितीने कोणासमक्ष करण्यात आली होती या बाबात स्पष्ट पुरावा उपलब्ध नसुन त्या बाटलीवर लावलेले कागदी लेबल व सिलच्या अनुषंगाने लेखी पुरावा संशयापलीकडे सिध्द होत नाही. म्हणुन आरोपीला संशयाचा फायदा देवुन मी मुद्दा क्रं. १ चे उत्तर नकारार्थी देतो आणि मुद्दा क्र.२ बाबत तसेच उत्तर देवुन मुद्दा क्र.३ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

मु.न्या.दं.
२१.०५.२०२६

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **हरिदास बाबुराव डोईजळ** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) मधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ प्रमाणे १५,०००/-(अक्षरी पंधरा हजार रुपये) रुपयाची वैयक्तीक किंवा जामीन मुचलका द्यावा.

३. सदर वैयक्तीक किंवा जामीन मुचलका पुढील ०६ महिन्यांसाठी अस्तित्वात राहील.

४. जप्त मुद्देमाल आधीच नाश केल्यामुळे त्याबाबत काहीही आदेश नाही.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

Digitally signed by SACHIN SADAFALE
Date: 2026.05.21 17:40:44 +0530

**(एस. पी. सदाफळे)**
दिनांक : २१.०५.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी,
गडचिरोली